<u>प्रतिनियुक्तीने नियुक्ती</u>

श्री. भाऊसाहेब गलांडे, उप जिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.२२), पुणे यांची उप जिल्हाधिकारी (Pune Ringroad Acquisition), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्र. टिआरएफ-०२२४/प्र.क्र.४५/ई-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०५ मार्च, २०२४

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५

२) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.४९/कार्या-१२, दि.१४.०७.२०२१

३) मा. भारत निवडणूक आयोगाचे क्र. ४३७/६/१/INST/ECI/FUNCT/MCC/२०२३, दि.२१.१२.२०२३, दि.२३.०२.२०२४ व दि.२७.०२.२०२४ रोजीची पत्रे.

शासन आदेश:-

मा. भारत निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन क्र.३ येथील पत्रांन्वये विहित केलेल्या तरतूदी तसेच महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढूण टाकणे) नियम, १९८१ च्या नियम-४० मधील परिशिष्ट-२ मधील विहित अटी व शर्तीना अधीन राहून श्री. भाऊसाहेब गलांडे, उप जिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.२२), पुणे यांची **उप जिल्हाधिकारी (Pune Ringroad Acquisition), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे** या पदावर **३ वर्षांच्या कालावधीसाठी** सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने **प्रतिनियुक्तीने नियुक्ती** करण्यात येत आहे.

२. सदर आदेश तात्काळ अंमलात येत असून श्री. भाऊसाहेब गलांडे, उप जिल्हाधिकारी यांना बदलीने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर तात्काळ रुजू होण्यासाठी ते धारण करत असलेल्या पदावरून या आदेशान्वये एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत असून त्यांनी पुढील सूचनांसाठी अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे हजर व्हावे.

३. उप जिल्हाधिकारी (Pune Ringroad Acquisition), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे या पदावरील प्रतिनियुक्तीच्या अनुषंगाने श्री. भाऊसाहेब गलांडे, उप जिल्हाधिकारी यांच्या सेवा अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४०३०५१८५०१३२२१९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH VITHOBA GAWDE

Digitally signed by SANTOSH VITHOBA GAWDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=8e111cd4ca87dbe700ee92d0e1b3fd993c8b0952a368e400ed2af72cb5dd990c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CA6A91A5EFCF2DDE6274B385D86F23914275B4E2B1125F6E74E6A1FAC7106C22, cn=SANTOSH VITHOBA GAWDE
Date: 2024.03.05 19:00:04 +05'30'

(संतोष वि. गावडे)
शासनाचे उप सचिव

प्रति,

- अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
- अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- विभागीय आयुक्त, पुणे.

प्रत,

- मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- संबंधित जिल्हाधिकारी.
- प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
- संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
- संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
- संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
- संबंधित उप जिल्हाधिकारी (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
- उप सचिव (ई-२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
- निवडनस्ती (ई-२).